# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

दूरध्वनी क्र. ०२४०-२४०३१०७

ई-मेलः election@bamu.ac.in, registrar@bamu.ac.in


## विद्यापीठ निवडणूक- २०२२

## जाहीर सूचना

### 'विद्यापरिषद-अध्यापक' गटाचे आरक्षण सोडतीद्वारे निश्चित केल्याबाबत

सर्व संबंधितांना जाहीर सूचनेद्वारे कळविण्यात येते की, 'विद्यापरिषद- अध्यापक' गटाचे आरक्षण सोडतीद्वारे निश्चित करण्यासंदर्भात महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ३२(३)(छ) ची तरतूद खालीलप्रमाणे आहे.

**कलम ३२(३)(छ)- अध्यापक गटाने आपल्यामधून निवडून द्यावयाचे पंधरा वर्षापेक्षा कमी नसेल इतका अध्यापनाचा अनुभव असलेले, प्रत्येक विद्याशाखेचे प्रतिनिधित्व करणारे दोन अध्यापक, त्यांपैकी एक अनुसूचित जातीची किंवा अनुसूचित जमातीची किंवा निरधिसूचित जमातीची (विमुक्त जाती) किंवा भटक्या जमातीची किंवा इतर मागासवर्गाची व्यक्ती असेल, परंतु प्रत्येक विद्याशाखेचे आरक्षण हे चिट्ठ्या टाकून काढलेल्या सोडतीद्वारे ठरवण्यात येईल.**

**परंतु, या खंडान्वये, प्रत्येक विद्याशाखेचे प्रतिनिधित्व करणाऱ्या अध्यापकांपैकी, एक अध्यापक ही, चिट्ठ्या टाकून काढलेल्या सोडतीद्वारे ठरवण्यात येईल अशी महिला असेल.**

त्या अनुषंगाने 'विद्यापरिषद-अध्यापक' गटाचे सोडतीद्वारे आरक्षण मा. कुलगुरू महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि. ०४-११-२०२२ रोजी दु. १२.३० वा. मुख्य प्रशासकीय इमारतीमधील महात्मा फुले सभागृह येथे निश्चित करण्यात आले.

सोडतीसाठी विद्यापीठाचे डॉ. प्रमोद येवले- मा. कुलगुरू, डॉ. शाम शिरसाठ- प्र-कुलगुरू, डॉ. भगवान साखळे- कुलसचिव तथा निवडणूक निर्णय अधिकारी, डॉ. विष्णू कऱ्हाळे- उपकुलसचिव, सामान्य प्रशासन, श्री. अर्जुन खांड्रे- कक्ष अधिकारी, श्री. संजय लांब हे उपस्थित होते. तसेच सोडतीसाठी विद्यापीठातील शिक्षक, महाविद्यालयीन शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचारी असलेले प्रतिनिधीदेखील उपस्थित होते.

सोडतीच्या चिठ्ठया कु. यश्विता संदीप वानखेडे हिच्या हस्ते काढण्यात आल्या.

सोडतीनंतर निश्चित झालेल्या आरक्षणाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | प्रवर्ग | सोडतीद्वारे निश्चित झालेले आरक्षण |
|---|---|---|
| १ | महिला (Women) | विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा |
| २ | अनुसूचित जाती (SC) | विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा |
| ३ | अनुसूचित जमाती (ST) | वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा |
| ४ | वि.जा./भटक्या जमाती (VJ/NT) | मानवविज्ञान विद्याशाखा |
| ५ | इतर मागास वर्ग (OBC) | आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा |

कृपया सर्व संबंधितांनी याची नोंद घ्यावी.

संदर्भ क्र. सा.प्र./निवडणूक/२०२२/470 )(
विद्यापीठ प्रांगण, औरंगाबाद )(
दिनांक- ०४-११-२०२२ )(

**कुलसचिव तथा**
**निवडणूक निर्णय अधिकारी**